MHSN100007652024

| | |
|---|---|
| खटला दाखल तारीख | : १३/०८/२०२४ |
| खटला नोंदणी तारीख | : १३/०८/२०२४ |
| खटला निकाल तारीख | : ११/०८/२०२६ |
| कालावधी | : वर्षे–महिने–दिवस<br>०१–११–२९ |

**विद्यमान न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, विटा, जि.सांगली यांचे न्यायालय.**

(श्रीमती.व्ही.डी.शिरसे – पिठासीन अधिकारी)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.४५८/२०२४** **नि.क्र.०९ लगत**

**अभियोग पक्ष –** **महाराष्ट्र शासन मार्फत**
पोलिस स्टेशन, विटा.
ता.खानापूर, जि. सांगली.

**–विरुध्द–**

**आरोपी –** **विलास मल्हारी यादव,**
वय – ४९ वर्षे, धंदा – मजुरी,
रा. बजरंगनगर, विटा, ता.खानापूर, जि.सांगली.

**आरोप –** **महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे ६५ (ड) प्रमाणे दंडनीय गुन्हा केल्याच्या आरोप.**

.................................................................................................

अभियोग पक्षाकरीता विधीज्ञ – ॲड. श्रीमती.ए.ए.कदम.

आरोपीकरिता विधीज्ञ – ॲड. श्री.व्ही.बी.कदम.

.................................................................................................

**न्या य नि र्ण य**

(आज दिनांक ११.०८.२०२६ रोजी पारीत केला)

प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ड) नुसार विटा पोलिस स्टेशन, विटा यांनी दोषारोप दाखल केल्यामुळे चालविण्यात आला.

०२. अभियोग पक्षाचे कथन असे आहे की, प्रकरणातील फिर्यादी श्री.ए.एम.जगदाळे, पोलिस शिपाई/६३४, विटा पोलिस स्टेशन यांनी फिर्याद दिली की, दि.०१.०८.२०२४ रोजी १९.२५ वाजताचे दरम्यान पारे नाका परीसरातील बजरंगनगर, विटा, ता.खानापूर, जि.सांगली येथील एका घराच्या आडोशास आरोपीच्या कब्जात कापडी पिशवीमध्ये बेकायदा, विना परवाना देशी देशी दारु पहिली धार संत्रा कंपनीच्या ९० मि.ली. च्या एकूण २४ बाटल्या एकूण किंमत रु.८४०/– किंमतीच्या बाळगलेल्या स्थितीत मिळून आल्या. आरोपीस ताब्यात घेवून त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव विलास मल्हारी यादव, रा.बजरंगनगर, विटा असे असल्याचे सांगितले. आरोपीच्या ताब्यातील मुद्देमाल त्यांनी दोन पंचासमक्ष जप्त करुन त्यापैकी दोन बाटल्या रासायनिक विश्लेषणाकरीता काढून व उर्वरित मुद्देमाल पुढील कार्यवाहीसाठी जमा केला व आरोपीविरुध्द सदर गुन्ह्याबाबत फिर्याद दिली.

०३. माझे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी आरोपी आणि अभियोग पक्षाचे दोषारोप पत्रावर म्हणणे ऐकल्यानंतर आरोपीला कलम ६५(ड) मुंबई दारुबंदी अधिनियमाचे अंतर्गत दंडनीय गुन्हा केल्याचा तपशील (निशाणी क्र.०९) समजून सांगितला असता त्याने गुन्हा कबूल नसल्याची जबानी दिली. अभियोग पक्षाने आरोपी विरुद्धचा गुन्हा सिध्द करण्यासाठी तीन साक्षीदारांना तपासले. तपासलेल्या साक्षीदारांच्या पुराव्यावरुन आरोपीच्या हिताविरुध्द दोषयुक्त स्थिती आल्यामुळे आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५१ अंतर्गत बयाण नि.क्र.१९ वर नोंदविले.

०४. आरोपपत्राच्या अवलोकनानंतर मी पुढील मुद्दे विचारार्थ घेतले व

त्यावरील निष्कर्षाची कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे केली आहे;

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने सिद्ध केले काय की, दिनांक ०१.०८.२०२४ रोजी १९.२५ वाजताचे दरम्यान बजरंगनगर, विटा, ता.खानापूर, जि.सांगली येथील एका घराच्या आडोशास आरोपीच्या कब्जात कापडी पिशवीमध्ये बेकायदा, विना परवाना देशी देशी दारु पहिली धार संत्रा कंपनीच्या ९० मि.ली. च्या एकूण २४ बाटल्या एकूण रु.८४०/–किंमतीच्या बाळगलेल्या स्थितीत मिळून आला आणि त्याद्वारे, त्याने मुंबई प्रतिबंधक अधिनियम चे कलम ६५ (ड) अन्वये गुन्हा केला ? | ...नाही... |
| २. | आदेश कोणता ? | ..अंतिम आदेशाप्रमाणे.. |

**–::निष्कर्षाची कारणमिमांसा::–**

**–मुद्दा क्र.०१ बाबत–**

०५. प्रकरणातील आरोपीच्या विरोधात आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे दोन जप्ती पंच व फिर्यादी यांना तपासण्यात आले.

०६. प्रस्तुत प्रकरणात आरोपी विरुध्दचा आरोप लक्षात घेता अभियोग पक्षाने घटनेच्या दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपी हा बेकायदेशिररित्या देशी दारु विक्री करणेच्या उद्देशाने बाळगलेल्या स्थितीत आढळून आला, ही बाब वाजवी संशयापलीकडे सिद्ध करणे गरजेचे आहे.

०७. सा.क्र.३ फिर्यादी अक्षय जगदाळे यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, दि.०१.०८.२०२४ रोजी ते पोलिस स्टेशन, विटा येथे कॉन्स्टेबल

या पदावर कार्यरत असताना सदर दिवशी पोलिस निरीक्षक श्री.शरद म्हेमाणे यांनी अवैध धंदयावर कार्यवाही करण्याच्या आदेशावरुन पो.ह.श्री.कराळे/१८७०,पो.कॉ. श्री.देशमुख/२२७२, पो.कॉ.श्री.सोनवणे/२४४३ आणि ते असे दोन पंचांसह खाजगी वाहनाने विटा शहरातील पारे नाका परीसरामध्ये पेट्रोलिंग करीत असताना त्यांना त्यांच्या बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, बजरंगनगर येथे विलास मल्हारी यादव हा इसम अवैधरित्या, बेकायदेशीरपणे देशी दारुची चोरुन विक्री करीत आहे. घटनास्थळी जाऊन वॉच केला असता सदर ठिकाणी एका घराच्या आडोशास एक इसम पिशवी घेऊन उभा असलेला दिसला. बातमीप्रमाणे संशय आल्यामुळे पंचांसह त्यास १९.२५ वाजता छापा टाकून पकडले. त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव विलास मल्हारी यादव असल्याचे सांगितले. त्याच्या सहमतीने पंचांसमक्ष त्याची अंगझडती घेतली. त्याच्या अंगझडतीमध्ये त्याच्या हातातील कापडी पिशवीमध्ये देशी दारु पहिली धार संत्रा कंपनीच्या ९० मिलीच्या एकूण २४ बाटल्या एकूण किंमत ८४०/- रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. आरोपीकडे मुद्देमाल बाळगण्याचा परवाना आहे का अशी विचारणा केली असता त्याने परवाना नसलयाचे सांगितले. मुद्देमाल पोलिस हवालदार श्री.कराळे/१८७० यांनी जप्त केला. जप्त मुद्देमालामधून एक रासायनिक नमुन्याकरीता आणि एक सुरक्षिततेकरीता काढून घेतला. त्यानंतर पोलिस स्टेशनला येऊन आरोपी विरुध्द फिर्याद (नि.क्र.१७) नोंदविली.

०८. त्यांनी त्यांच्या उलटतपासात असे मान्य केले की, बजरंगनगर ते विटा पोलिस स्टेशनमधील अंतर दिड किलोमीटर आहे. खाजगी वाहनाने जर बजरंगनगर येथे यायचे असेल तर पाच ते सहा मिनीटांचा वेळ लागतो. बजरंगनगर येथील बजरंग वस्ती येथे बरीच राहती घरे आहेत. बजरंगनगर येथे वस्ती असल्यामुळे तेथे बऱ्याच लोकांची वर्दळ असते. बजरंगवस्ती येथे नगरपालिकेची लाईटची व्यवस्था नाही. घटना घडल्यापासून फिर्याद देण्यासाठी दोन तासांचा कालावधी लागला. कापडी पिशवी कोणत्या रंगाची होती ही बाब फिर्यादमध्ये नमूद

नाही. छापा टाकला त्यावेळी त्यांची व त्यांच्या सहकाऱ्यांची अंगझडती पंचांना व आरोपींना दिलेली नाही. कोणत्याही देशी दारुच्या बॉटलवर निर्मीती दिनांक, निर्मीती कंपनी, निर्मीती क्रमांक नमूद असतो. फिर्यादमध्ये जप्त मुद्देमालाची निर्मीती दिनांक, निर्मीती कंपनी, निर्मीती क्रमांक या बाबी नमूद केलेल्या नाहीत. रासायनिक विष्लेशनाकरीता नमूना हा सगळया बॉटल्समधील घेतलेला नाही. जप्त मुद्देमालासारख्या बॉटल्स परवानाधारक वाईन शॉप आणि देशी दारु दुकानामध्ये सहजरित्या उपलब्ध होत असतात. इतर उत्तरसूचक प्रश्नांना सदरील साक्षीदाराने नकारार्थी उत्तरे दिली.

०९. सा.क्र.१ सचिन तावरे व सा.क्र.२ गणेश कैलास चिनके जप्ती पंच साक्षीदार यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले की, दि.०१.०८.२०२४ रोजी पोलिसांनी जप्ती पंचनामा करणेसाठी कोठेही बोलाविले नव्हते, त्यांचेसमक्ष काहीही जप्त केले नव्हते. त्यांनी पंचनाम्यावरील त्यांची सही अनुक्रमे नि.क्र.१० व ११ वर ओळखली. परंतु, त्यातील मजकूर त्यांना माहीत नसलेचे कथन केले. सदर जप्ती पंच अभियोग पक्षास फितुर झाल्यामुळे जप्त मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातून प्राप्त झाला ही महत्वाची बाब अभियोग पक्षाला सिध्द करता आली नाही. त्यामुळे जप्ती पंचनामा सिध्द झाला नाही.

१०. वर चर्चा केल्याप्रमाणे जप्त केलेले द्रव्य ही देशी दारू होती किंवा कसे हे दर्शविणारा निर्णायक पुरावा म्हणुन रासयणीक पृथःकरण अहवाल अभिलेखावर दाखल केलेला आहे. परंतु सदरचा अहवाल सिध्द करण्यासाठी तज्ञ साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षाने नोंदवलेली नाही. सरकारी साक्षीदार क्र.३ फिर्यादी यांची साक्ष अभियोगपक्षास दुजोरा देते, परंतु साक्षीदार क्र. १ व २ जप्ती पंच अभियोग पक्षाच्या कथनाला पुष्टी देत नाहीत. तसेच अभियोग पक्षास वेळोवेळी संधी देऊनही इतर स्वतंत्र साक्षीदारांचा पुरावा अभिलेखावर आणता आले नाही. सदर खटल्यातील तपासी अधिकारी व इतर साक्षीदार या महत्वाच्या साक्षीदारांना तपासलेले नाही. तसेच जप्त मुद्देमाल न्यायालयासमक्ष आणला नाही.

११. प्रकरणात स्वतंत्र साक्षीदार तपासण्यात आलेला नाही. त्यामुळे, आरोपाप्रमाणे आरोपीने वर नमूद दारु विक्रीचे उद्देशाने बाळगली असल्याची बाब सिध्द होत नाही. परिमाणी, अभियोग पक्ष आरोपाप्रमाणे घटनेच्या दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपी हा वर नमूद दारु बाळगून होता, ही बाब अभिलेखावर सिद्ध करण्यात अपयशी ठरला आहे. त्यामुळे, मी मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्रमांक २ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेः

## आदेश

१. आरोपी विलास मल्हारी यादव यांना भारतीय नागरी सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) अन्वये मुंबई दारुबंदी प्रतिबंध कायदा,१९४९च्या कलम ६५(ड) या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. प्रकरणातील अपिलाचा कालावधी संपल्यानंतर जप्त मुद्देमालाची कायदेशीर रितीने व निसर्गातील इतर सजीवांना व घटकांना इजा पोहचू नये अशा पध्दतीने विल्हेवाट लावण्यात यावी. जप्त मुद्देमाल कापडी पिशवी ही मुल्यहीन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर त्याची नियमानुसार योग्य ती विल्हेवाट लावण्यात यावी.

३. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

४. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१(१) च्या पुर्ततेकरीता मा. वरीष्ठ न्यायालयीन निर्देश दिल्यानंतर हजर राहण्याकरीता रक्कम रुपये १५०००/- चे बंधपत्र व तितक्याच रक्कमेचा जामीन द्यावा.

(न्यायनिर्णय संगणकावर टंकलिखित करुन खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Digitally signed by VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Date: 2026.08.12 15:47:27 +0530

ठिकाण : विटा.
दिनांक : ११.०८.२०२६

(श्रीमती.व्ही.डी.शिरसे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, विटा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | G. U.Varude, |
| Name of the Court | :- | Smt. V. D. Shirse,<br>Jt. Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 11.08.2026 |
| Order signed by P.O. on | :- | 11.08.2026 |
| Order uploaded on | :- | 12.08.2026 |